दसरा

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आता मेट्रोची धाव निगडीपर्यंत!

## आता जप्त मालमत्तांचा करण्यात येणार लिलाव

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी ते निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत मेट्रो धावण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. निगडीपर्यंतच्या प्रस्तावाला केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कामकाज मंत्रालयाने सोमवारी २३ ऑक्टोबर मान्यता दिली. त्यामुळे शहरवासीयांचे निगडीपर्यंत मेट्रोचे स्वप्न पूर्ण होणार आहे. पहिल्या टप्प्यात पिंपरी ते दापोडी हा ७.९ किलोमीटरचा मार्ग १ ऑगस्ट २०२३ पासून सुरू झाला होता. तर, पिंपरी ते फुगेवाडी हा मार्ग ६ मार्च २०२२ पासून सुरू झाला आहे. या मार्गाच्या कामासोबत पिंपरी ते निगडी या ४.१३ किलोमीटर अंतराच्या मार्गाचे काम सुरू करावे, अशी नागरिकांची आग्रही मागणी होती. त्यासाठी सातत्याने आंदोलने झाली. त्यानंतर राज्य सरकारने निगडीपर्यंतच्या मेट्रो मार्गाला मान्यता दिली. केंद्र सरकारकडे दोन वर्षांपासून प्रस्ताव रखडला होता.





अखेर केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कामकाज मंत्रालयाचे उपसचिव सुनील कुमार यांनी निगडीपर्यंत मेट्रोला मान्यता दिल्याचे पत्र राज्य सरकारला पाठविले आहे. त्यामुळे निगडीपर्यंत मेट्रो धावण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या विस्तारित मार्गावर चिंचवड स्टेशन येथील पिंपरी पोलीस ठाणे, आकुर्डीतील खंडोबा माळ चौक आणि निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक असे तीन स्टेशन आहेत. हा मार्ग ४.१३ किलोमीटर लांबीचा असून तो उन्नत (एलिव्हेटेड कॉरिडॉर) मार्ग असणार आहे. खर्चात केंद्र सरकार आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेचा समप्रमाणात वाटा असेल. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अंदाजे खर्च ९१०.१८ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या मार्गामुळे निगडी ते दापोडी या मुख्य मार्गावर १२.५० किलोमीटर अंतराची मेट्रो प्रवासी सेवा उपलब्ध होईल. पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक सक्षम करण्यासाठी पीएमपीएल बस वाहतूक सोबत मेट्रो निगडी पर्यंत धावली पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांची आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची आग्रही मागणी होती. पिंपरी ते निगडी भक्ती-शक्ती चौकापर्यंत मेट्रो विस्तारीकरणाच्या प्रस्तावाला केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कामकाज मंत्रालयाने आज मान्यता दिली. पहिल्या टप्प्यात १ ऑगस्ट २०२३ पासून पिंपरी ते दापोडी असा ७.९ किलोमीटरचा मार्ग सुरू झाला होता. त्यानंतर दुसऱ्या वेळी पिंपरी ते सिव्हील कोर्ट अशी १३.९ किलोमीटर मेट्रो धावू लागली आहे. यापूर्वी असणाऱ्या विरोधी पक्षाच्या चुकीच्या नियोजनामुळे मेट्रो महामार्ग निगडी पर्यंत न धावता पिंपरी पर्यंतच करण्यात आला होता. मात्र, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी मेट्रो महामार्ग निगडीपर्यंत जाण्यासाठी आग्रही भूमिका घेतली. त्या प्रस्तावाला राज्य सरकारची मंजुरी घेऊन प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवून दिला होता तो मागील काही दिवसापासून प्रलंबित होता. मात्र, राज्यात पुन्हा सत्तेत सहभागी झाल्यानंतर अजितदादा पवार यांनी या मागणीचा सातत्याने पाठपुरावा घेतला. आज केंद्र सरकारने निगडी पर्यंत मेट्रो महामार्ग होण्यास हिरवा कंदील दिला आहे. यामुळे आकुर्डी, चिंचवड, निगडी, तळवडे, चिखली परिसरातील नागरिकांची निगडीपर्यंत मेट्रो सुरु करण्याची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. पिंपरी-चिंचवडमधील रहिवाशांना पुणे शहर सोबत चांगली कनेक्टिव्हिटी देण्यासाठी हा मेट्रो प्रकल्प फायदेशीर ठरणार आहे असं संजोग वाघेरे पाटील यांनी म्हटले आहे.

> **“शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. निगडीपर्यंत मेट्रो धावण्याचे शहरवासीयांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि पिंपरी-चिंचवडमधील रहिवाशांना चांगली ‘कनेक्टिव्हिटी’ देण्यासाठी हा मेट्रो प्रकल्प फायदेशीर ठरणार आहे. लवकरच प्रकल्पाचे काम सुरू होईल.**
> **– श्रीरंग बारणे, खासदार**

# विश्वचषक सामन्यावर ऑनलाईन बेटिंग; ४० लाखांची रोकड जप्त!

## पिंपरी चिंचवड पोलिसांचा गुंड बुकीवर छापा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पोलीस आयुक्तालयातील गुंडा विरोधी पथकाने धडाकेबाज कामगिरी करत इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका क्रिकेट सामन्यावर बेटिंग घेणाऱ्या बुकींचा पर्दाफाश करत ४० लाखांची रोख रक्कम जप्त करत एकाला अटक केली आहे. शनिवारी इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका हा सामना झाला यामध्ये दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडला हरवले. पिंपरी- चिंचवडमध्ये गुंडा विरोधी पथकाची बुकिंवर नजर असून यामध्ये लाखोंचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. विश्वचषक असल्याने पिंपरी- चिंचवडमध्ये मोठ्या प्रमाणावर सट्टा लावला जातो, हे लक्षात घेऊन गुंडा विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने यांनी मोठी कारवाई केली आहे. इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका सामना सुरू असताना त्याच्यावर बेटिंग घेणाऱ्या एकाला



पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून ४० लाख रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. गुंडा विरोधी पथकातील पोलीस कर्मचारी यांनी तांत्रिक विश्लेषण करून आरोपीला बेड्या ठोकल्या. या प्रकरणी आरोपी दिनेश हरीश शर्मा (वय ३८ वर्ष) याला अटक करण्यात आली आहे. इंग्लंड जिंकल्या एक रुपये साठ पैसे तर साऊथ आफ्रिका जिंकल्यास एक रुपये ६१ पैशाचा भाव मॅच पूर्वी ठरलेला होता. जस जसा मॅच रंगतदार स्थितीत जात होता तसे भाव वर खाली होत होते. ‘हाय लगाई’ नावाने हाच सट्टा सुरू होता. अखेर काळेवाडीतील त्या फ्लॅटवर छापा टाकून पोलिसांच्या गुंडा विरोधी पथकाने एकाला अटक केली आहे. दिनेश हा गुंडाविरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने यांच्यापुढे गया-वया करत माझी या प्रकरणातून सुटका करा असं म्हणत असल्याचा व्हिडिओ समोर आला आहे, मात्र त्याला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. घटनास्थळी तब्बल ४० लाख रुपयांची रोख रक्कम मिळाली आहे. या प्रकरणात आणखी काही बडे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे.

# दापोडीतील कचऱ्यामुळे आरोग्याला धोका!

## ओसंडून वाहणाऱ्या कचराकुंड्यामुळे चाकरमानी, विद्यार्थी त्रस्त

**मावळ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
दापोडी येथे कचरा संकलन करून, तो वेळेत उचलला जात नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. कचऱ्यामुळे परिसराला बकालपणा आला आहे. याचबरोबर ओसंडून वाहणाऱ्या कचराकुंड्याचा त्रास विद्यार्थी, चाकरमानी मंडळी यांना सोसावा लागत आहे. येथील सी. एम. ई. भिंत, नदी किनारा परिसर, अत्तार वीटभट्टी, मुंबई-पुणे मुख्य रस्त्याचे भुयारी मार्ग, सिद्धार्थनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक गावठाण दरम्यान रस्त्यालगत असलेल्या मैदानावर उघड्यावर कचरा अस्ताव्यस्त पसरलेला असतो.



यातच भटकी कुत्री, भटकी जनावरे व वाऱ्यामुळे हा कचरा संपूर्ण मैदानावर पसरला जातो. दापोडी परिसरातील कचरा संकलन वेळेत करून कचरा साचून न ठेवता कचरा तत्काळ उचलण्यात यावा, अशी मागणी रिपाई आठवले गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. कचराकुंडीमुक्त प्रभाग करताना कचराकुंड्या काढून टाकण्यात आलेल्या ठिकाणी कचरा पडत आहे. अपुरी यंत्रणा, अपुरे मनुष्यबळ व अनियमितता यामुळे कचरा साचून राहत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी प्रभागातील कचरा संकलनासाठी - ६ गाड्या, २ मोठ्या गाड्या, एकूण मनुष्यबळ - ६९ ''साचून राहिलेल्या कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शालेय विद्यार्थी, कामगार यांना दुर्गंधीचा त्रास सहन करत ये-जा करावी लागत आहे.

> **''परिसरातील कचरा नियमित उचलला जात आहे. मोकळ्या जागा, मैदाने, अडगळीच्या बाजूला पडणारा कचरा रोखण्यासाठी अनेकदा रात्री अकरापर्यंत कर्मचारी उभे करण्याचा प्रयत्न करूनही हॉटेल व्यावसायिक, भाजी विक्रेते, खाऊ गल्लीचा कचरा व घरातून निघताना चाकरमानी मंडळी कचरा टाकतात. नागरिकांनी कचरा गाडीतच कचरा द्यावा.''**
>
> **- उमेश जाधव, सहायक आरोग्य अधिकारी, दापोडी विभाग**

# महाभोंडला कार्यक्रमास महिलांचा मोठा प्रतिसाद!

## शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्याकडून कविता दळवी यांचे कौतुक

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
कविता पंढरीनाथ दळवी यांच्या संकल्पेतुन भव्य गौरी गणपती सजावट स्पर्धा आयोजित केली होती. दळवी नगर, इंदिरानगर, प्रेमलोकपार्क, गिरीराज पार्क, बिजलीनगर, शिवनगरी, चिंचवडे नगर, वाल्हेकरवाडी यासह प्रभाग क्रमांक १७ मधील एक हजारहून अधिक कुटुंबानी सहभाग नोंदवत मोठा प्रतिसाद दिला. स्पर्धेतील विजेत्यांना रविवारी शुभम गार्डन येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात बक्षीस




वितरण करण्यात आले. यावेळी आमदार अश्विनीताई जगताप, आमदार उमाताई खापरे, शहराध्यक्ष शंकरशेठ जगताप यांनी कविता दळवी यांच्या आयोजनाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. गौरी सजावट स्पर्धेत इंदू झोळ यांना प्रथम, संतोषी सायकर यांना दुसरे तर निशा कदलगावकर यांना तिसरे पारितोषिक मिळाले. गणपती स्पर्धेत सविता टकले यांना प्रथम, संगीता धिंमते यांना दुसरे व रोहिणी लोखंडे यांना तिसरे पारितोषिक मिळाले. यावेळी आयर्नमॅन स्वप्नील चिंचवडे व क्रिकेटपटू यश जगदाळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच आदर्श नऊ नारीशक्तींचा सन्मान देखील आयोजित केला होता. यामध्ये आदर्श डॉक्टर सपना निकाजू, आदर्श पोलीस मनिषा कांबळे, आदर्श सफाई कामगार जमुला लखन, आदर्श वकील सोनाली सारस्वत, आदर्श आई सुभद्राताई ढोरे, आदर्श कीर्तनकार माई सपकाळ, आदर्श समाजसेवक संस्कृती गोडसे, आदर्श शिक्षक भावना चव्हाण व आदर्श सेवक पल्लवी मारकड यांना गौरविण्यात आले. यावेळी नामदेव ढाके, प.पु.श्री पुंडलिक महाराज गरुड (श्री दत्तात्रेय कानिफनाथ सेवा ट्रस्ट) श्री क्षेत्र इंदोरी, शामराव वाल्हेकर, काळूराम बारणे, शेखर चिंचवडे, निलेश भोंडवे, तात्या आहेर, सचिन शिवले, राजेंद्र चिंचवडे, विनोद मालू,भारत दळवी, राजेंद्र दळवी, सचिन दळवी, विजय दळवी, संतोष दळवी, नितीन दळवी, अविनाश दळवी, किरण दळवी, अथर्व दळवी, पल्लवी वाल्हेकर, पल्लवी मारकड, मनीषा चिंचवडे, नीलम चिंचवडे, अमृता नवले, मंदा आव्हाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# दादांपाठोपाठ आता ताई झेडपीमध्ये!

## जिल्हा परिषदेच्या कामांचा आढावा घेतला, अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पालकमंत्री झाल्यानंतर दोन दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे शहरासह जिल्हा परिषदेतील कामांचा आढावा घेताना शिक्षण, बांधकाम विभागांची झाडाझडती घेतली. त्यानंतर दोन दिवसांनी आता बारामती लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी कार्यकर्त्यांसह जिल्हा परिषदेत कामांचा आढावा घेत सूचना केल्या. काही दिवसांपूर्वी पुण्यात एका जाहीर कार्यक्रमात, पुण्याचे कारभारी बदलले आहेत. आता पुण्यात लक्ष घालणार आहोत, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले होते. त्याबाबत पालकमंत्री अजित पवार यांना विचारता त्यांनी त्याबाबत फारसे बोलणे टाळले. त्याच दिवशी शुक्रवारी अजित पवार यांनी जिल्हा परिषदेत देऊन आपल्या स्टाइलने कामांचा आढावा घेतला. अजितदादा पालकमंत्री झाल्यानंतर पुण्यात सक्रिय झाले आहे. त्या पाठोपाठ खासदार सुप्रिया सुळे या ॲक्शन मोडमध्ये आल्या आहेत. त्यांनी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुप्रिया सुळे यांची सोमवारी भेट दिली. त्यावेळी विविध कामांचा आढावाही त्यांनी घेतला. एकाच ग्रामसेवककाकडे तीन-चार ग्रामपंचायतींचा कार्यभार असल्याने नागरिकांची कामे ठप्प होत आहेत. तसेच बारामती लोकसभा मतदारसंघातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. तसेच औषध



पुरवठाचा आढावा घ्यावा, अशी मागणी सुळे यांनी केली. अंगणवाड्यामध्ये पाणी, वीज, स्वच्छता गृहांची सुविधा योग्यरित्या उपलब्ध करावी. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारती धोकादायक झाल्या आहेत. त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यात यावी. तसेच मुलींच्या जन्म दरचा अहवाल वेळोवेळी तयार करावा. वैयक्तिक लाभांच्या योजना, लाभार्थ्यांचा अहवाल तयार करून माहिती उपलब्ध करावी, अशी मागणी त्यांनी केली. जिल्हा नियोजन समितीतंर्गत मंजूर कामांची सद्यस्थिती माहिती उपलब्ध व्हावी. कामे तातडीने पूर्ण होण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही लवकरात लवकर व्हावी, अशीही मागणी केली. मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण यांनी त्यांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. खासदार सुप्रिया सुळे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातील रस्त्यांबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. त्यावेळी प्रकल्प संचालक संजय कदम यांनी या ठिकाणच्या रस्त्यांची माहिती दिली. बारामती लोकसभा मतदारसंघात राष्ट्रीय महामार्गावर होणारे अपघात चिंताजनक आहेत. त्यामुळे रस्ते सुरक्षिततेला प्राधान्य देण्याकडे लक्ष वेधण्यात आले. मतदारसंघातील प्रत्येक महामार्ग हा 'झिरो ॲक्सिडेंट झोन' करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी महामार्ग प्राधिकरण तसेच विविध सामाजिक संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. नवले पुल परिसरातील अपघात कमी करण्यासाठी आणखी उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी लवकरच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे तज्ज्ञ नवले पुलाची पाहणी करणार आहेत.

### शाळांच्या इमारती धोकादायक

**» एकाच ग्रामसेवककाकडे तीन-चार ग्रामपंचायतींचा कार्यभार असल्याने नागरिकांची कामे ठप्प होत आहेत. तसेच बारामती लोकसभा मतदारसंघातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. तसेच औषध पुरवठाचा आढावा घ्यावा, अशी मागणी सुळे यांनी केली. अंगणवाड्यामध्ये पाणी, वीज, स्वच्छता गृहांची सुविधा योग्यरित्या उपलब्ध करावी. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारती धोकादायक झाल्या आहेत. त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यात यावी. तसेच मुलींच्या जन्म दरचा अहवाल वेळोवेळी तयार करावा. वैयक्तिक लाभांच्या योजना, लाभार्थ्यांचा अहवाल तयार करून माहिती उपलब्ध करावी, अशी मागणी त्यांनी केली.**

# लोकांना वाटले की मी बंद खोलीत रडत बसेन!

## माझ्यावर दोन वेळा शाई फेकली : चंद्रकांत पाटील

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
'मी चळवळीतून आलेला कार्यकर्ता आहे. तुमचे विषय मार्गी लावावे, असे वाटत असेल, तर मोर्चे काढा. तुम्ही आरडाओरडा केल्यावर, आम्हालाही आढावा बैठका लावता येतात', असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील महिला प्राध्यापकांना केले आहे. 'माझ्यावर शाई फेकतात, पण मी शर्ट बदलून बाहेर पडतो. बिचारे ते निराश होतात. दोनवेळा शाई फेकण्यात आली. लोकांना वाटले की, मी घाबरून बंद खोलीत रडत बसेन. पण, मी शर्ट बदलून तिसऱ्या मिनिटांला बाहेर पडतो', असेही पाटील यांनी सांगितले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या वतीने आयोजित महिला सक्षमीकरण परिषदेत पाटील बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार आदी उपस्थित होते. पाटील म्हणाले की, दिवसभर चालणाऱ्या या परिषदेत काही मागण्या



अशा निर्माण करा की, त्या चर्चेद्वारे पूर्ण होतील. शालेय विद्यार्थिनींना आपण एसटी बसचा पास दिला आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थिनींना एसटी बसचा पास देता येईल का, याबाबतही चर्चा करता येईल. शालेय विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी आपण सायकली दिल्या आहेत. विद्यार्थिनींना घरापासून महाविद्यालयाचे अंतर दूर पडत असल्याने, ओडिशा सरकारने त्यांना स्कूटी देण्याचा निर्णय घेतला. तसाच प्रयोग आपल्याकडे करता येईल, याबाबतची विचार सुरू असल्याचे पाटील यांनी सांगितले. मी इथे बोलत असताना, मला जाणीव आहे की, काही पत्रकार दृश्य आणि अदृश्य स्वरूपात येथे उपस्थित असतील. त्यामुळे ते आता छापतील की, विद्यार्थिनींना स्कूटी देण्याचा निर्णय झाला. मी माईकमधून काय बोलतो आणि मिडियात काय बाहेर पडत, यामध्ये फारच फरक पडत आहे.

### शालेय विद्यार्थिनींना सायकली दिल्या

**» दिवसभर चालणाऱ्या या परिषदेत काही मागण्या अशा निर्माण करा की, त्या चर्चेद्वारे पूर्ण होतील. शालेय विद्यार्थिनींना आपण एसटी बसचा पास दिला आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थिनींना एसटी बसचा पास देता येईल का, याबाबतही चर्चा करता येईल. शालेय विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी आपण सायकली दिल्या आहेत. विद्यार्थिनींना घरापासून महाविद्यालयाचे अंतर दूर पडत असल्याने, ओडिशा सरकारने त्यांना स्कूटी देण्याचा निर्णय घेतला. तसाच प्रयोग आपल्याकडे करता येईल, याबाबतची विचार सुरू असल्याचे पाटील यांनी सांगितले.**

# गूळ उद्योग नामशेष होण्याच्या मार्गावर!

## सरकार गुऱ्हाळघरांवर नियंत्रणे लादणार?

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

सन १९८० मध्ये दर्जेदार गूळ कोल्हापूरच्या पेठेत ४० रुपये किलो दराने विकला जात होता आणि आता ४३ वर्षांनंतरही त्याच दराने गूळ विकत आहोत. उत्पादन खर्चही निघेना, त्यामुळे गुळात भेसळ वाढली आहे. गुऱ्हाळघरांना टाळे लागत असताना गुऱ्हाळ घरांवर नियंत्रणे कसली लादता, असा जाब कराड, शिराळा आणि कोल्हापुरातील गुऱ्हाळघरचालकांकडून विचारला जात आहे.राज्य सरकार शेतकरी हिताचे कारण देत गुऱ्हाळघरांवर नियंत्रणे लादण्याच्या विचारात आहे. त्या विरोधात पश्चिम महाराष्ट्रातील गूळ उत्पादकांकडून आवाज उठवला जात आहे.



कोल्हापुरातील गूळउत्पादक आणि शेतकरी संघटनेचे नेते आदम मुजावर म्हणाले, मी १९८० मध्ये माझ्या गुऱ्हाळघरात तयार केलेला दर्जेदार गूळ ४० रुपये किलो दराने कोल्हापूरच्या बाजारपेठेत विकला आहे. आज ४३ वर्षांनंतरही माझ्या गुळाला ४०-४५ रुपयांच्या वर दर मिळत नाही. उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळे गुळात साखरेची भेसळ वाढली आहे. एक किलो गुळात ७० टक्के साखर आणि ३० टक्के उसाचा रस असतो. कर्नाटकातून येणारा भेसळयुक्त गूळ आमच्या सरकारी यंत्रणेने रोखला नाही. त्यामुळे दर्जा नसलेला कर्नाटकी गूळ कोल्हापूरचा गूळ म्हणून विकला गेला. व्यापाऱ्यांना पैसे मिळाले, बाजार समितीला सेस मिळाला, पण कोल्हापूरचा गूळ बदनाम झाला. कोल्हापूरच्या गुळाच्या दर्जावर लोकांचा विश्वास राहिला नाही. त्यामुळे आता गुळाला मागणी राहिली नाही. दर्जेदार, सेंद्रीय किंवा कमी रसायनांचा वापर करून गूळ निर्मितीचा प्रतिकिलो उत्पादनखर्च ७० रुपयांच्या घरात आहे. तितका दर मिळत नाही. त्यामुळे भेसळ करून गूळ उत्पादन होते. वाढलेली मजुरी, कामगारांकडून होणारी फसवणूक, वीज, इंधन आणि वाहतुकीच्या वाढलेल्या दरामुळे गुऱ्हाळघरांना टाळे लागत आहे. अशा स्थितीत सरकारी मदतीची गरज असताना, राज्य सरकार गुऱ्हाळघरांवर नियंत्रणे, निर्बंध लादण्याचा विचार करत असेल, तर आम्ही त्याला कोल्हापुरी पद्धतीने विरोध करू. आदम मुजावर म्हणाले, की कोल्हापुरात मागील वर्षी शंभर गुऱ्हाळे सुरू होती. यंदा जेमतेम ४० सुरू होतील. शिराळा येथील सुभाष नामदेव पाटील म्हणाले, की पाच वर्षांपूर्वी शिराळ्यात ४० गुऱ्हाळे होती, आता फक्त एकच राहिले आहे.

### पुन्हा वर्षा बंगल्यात घुसू


» शरद पवार मुख्यमंत्री असताना गुऱ्हाळघरांवर नियंत्रण आणण्याचा विचार सुरू होता. त्यामुळे कोल्हापूरचे नेते श्रीपतराव बोंद्रे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही वर्षा बंगल्यात घुसलो होतो. आताही तसेच आंदोलन करावे लागणार आहे. गूळ उद्योग अडचणीत असताना मदत करण्याऐवजी उद्योगासमोर अडचणी आणण्याचा सरकारचा डाव आहे, असा इशारा कराड तालुका गूळ उत्पादक संघाचे उपाध्यक्ष सुभाष भोसले यांनी सांगितले.

# पीएमपीचे अध्यक्ष सचिन्द्र प्रताप सिंह यांची बदली!

## स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोलते यांच्याकडे पदभार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पीएमपीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सचिन्द्र प्रताप सिंह यांची अवघ्या तीन महिन्यांत बदली करण्यात आली आहे. स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोलते यांच्याकडे हा पदभार देण्यात आला आहे.राज्य शासनाने त्याबाबतचे आदेश काढले असून गेल्या १६ वर्षांत पीएमपीने २० अध्यक्ष आणि संचालक पाहिले असून यातील एकाही अध्यक्षाला कार्यकाळ पूर्णवेळ मिळालेला नाही. त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील किमान दहा



लाख प्रवाशांची प्रमुख सार्वजनिक सेवेबाबतची अनास्थाही पुढे आली आहे. सचिन्द्र प्रताप सिंह यांची तीन महिन्यांपूर्वी पीएमपीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तीन महिन्यांत त्यांनी प्रवासी केंद्रित धोरणे अवलंबण्यास सुरुवात केली. त्यांतर्गत प्रवासी मित्र, आगारांमध्ये पालक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या त्यांनी केल्या. पीएमपीमध्ये कॅशलेस तिकीट प्रणाली सुरू केली. शिस्तभंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निलंबन केले. त्यामुळे पीएमपीचा कारभार रूळावर येत असतानाच त्यांची अचानक बदली करण्यात आली. त्यांची दिव्यांग कल्याण आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली असून नवे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संजय कोलते यांनी सोमवारी पदभार स्वीकारला. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांमधील सेवांचे विलीनीकरण करून पीएमपीची स्थापना सोळा वर्षांपूर्वी करण्यात आली. या सोळा वर्षांच्या कालावधीत २० अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांची बदली करण्यात आली. यातील आर. एन. जोशी वगळता एकाही अध्यक्षाला पूर्ण कार्यकाळ मिळाला नाही. तर अनेकदा महापालिका आयुक्त किंवा अतिरिक्त आयुक्तांकडेच या पदाची प्रभारी जबाबदारी देण्यात आली होती. त्यामुळे सार्वजनिक सेवेबाबतची सत्ताधाऱ्यांची अनास्थाही यामुळे अधोरेखित झाली आहे.

### दव्यांग कल्याण आयुक्त म्हणून नियुक्ती

» सचिन्द्र प्रताप सिंह यांची तीन महिन्यांपूर्वी पीएमपीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तीन महिन्यात त्यांनी प्रवासी केंद्रित धोरणे अवलंबण्यास सुरुवात केली. त्याअंतर्गत प्रवासी मित्र, आगारांमध्ये पालक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या त्यांनी केल्या. पीएमपीमध्ये कॅशलेस तिकीट प्रणाली सुरु केली. शिस्तभंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निलंबन केले. त्यामुळे पीएमपीचा कारभार रूळावर येत असतानाच त्यांची अचानक बदली करण्यात आली. त्यांची दिव्यांग कल्याण आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली असून नवे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संजय कोलते यांनी सोमवारी पदभार स्वीकारला.